पुणे जिल्हा परिषद, पुणे
सामान्य प्रशासन विभाग (विधी कक्ष)
यशवंतराव चव्हाण भवन ", 1 वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे 411 001

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Tel. – 020 – 26134806
Fax. – 020- 26138920

email - dyceogad.punezp@gmail.com
Website - www.zppune.org

जा.क्र. साप्रवि / विधी कक्ष / 50 / 2023. **पुणे. दिनांक :- 09 फेब्रुवारी, 2023.**

वाचा :- (1) पुणे जिल्हा परिषद, पुणे मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक 29/07/2022 मधील विषय क्र. 80 व ठराव क्रमांक 87 च्या मान्यतेने.

(2) दिनांक 01/09/2022 रोजीच्या दैनिक सामना, दैनिक पुढारी व दैनिक पुण्यनगरी या वर्तमानपत्रातील मराठी व दिनांक 02/09/2022 रोजीच्या इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रातील इंग्रजी जाहिरात.

(3) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील दिनांक 28/09/2022 रोजीचे प्रसिध्दीपत्रक,

(4) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील आदेश जा.क्र. साप्रवि/विधी कक्ष/180/2022, पुणे दिनांक 28/09/2022.

(5) गठीत निवड समितीकडील पात्र उमेदवारांच्या शिफारशीचा अहवाल.

(6) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचेकडील मान्य टिपणी दिनांक 09/02/2023.

आ दे श

पुणे जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच क्षेत्रीय स्तरावरील प्रलंबित असलेल्या व नव्याने दाखल होणाऱ्या दाव्यांसंदर्भात विविध स्तरावरील प्रकरणांमध्ये पुणे जिल्हा परिषदेची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी तसेच विविध न्यायालयातील सर्व प्रकरणांबाबत कायदेशीर सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणेकामी पुणे जिल्हा परिषदेकरीता वकील पॅनल वर विधी तज्ञांची नेमणूक करणेकामी वरील संदर्भ क्र. 1 अन्वये मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने आदेशाच्या दिनांकापासून किमान 5 वर्षाकरीता किंवा पुढील पॅनल नेमणुकीचा आदेश पारित होईल तोपर्यंत विधी पॅनलची स्थापना करण्यांत आलेली आहे.

Scanned with CamScanner

त्यानुषंगाने संदर्भ क्र. 2 नुसार विधी पॅनलचे पुनर्गठण करणेकामी दिनांक 01/09/2022 रोजीच्या दैनिक सामना, दैनिक पुढारी व दैनिक पुण्यनगरी या वर्तमानपत्रामध्ये मराठी व दिनांक 02/09/2022 रोजीच्या इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रामध्ये इंग्रजी जाहिरात प्रसिध्द करण्यांत येऊन दिनांक 22/09/2022 अखेर जिल्हा परिषदेच्या **www.zppune.org** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या ऑनलाईन गुगल फॉर्म दवारे अर्ज सादर करणेकामी कळविण्यांत आलेले होते.

तथापि अनेक पात्र व इच्छूक उमेदवारांना मुदतीत आवेदनपत्र सादर करता आलेली नाहीत, ही बाब विचारात घेऊन संदर्भ क्र. 3 च्या प्रसिध्दीपत्रकान्वये जिल्हा परिषदेच्या **www.zppune.org** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या ऑनलाईन गुगल फॉर्म दवारे अर्ज सादर करणेकामी दिनांक 15 ऑक्टोंबर, 2022 अखेर मुदतवाढ देण्यांत आलेली होती.

मुलाखतीस पात्र उमेदवारांच्या ऑनलाईन झुम ॲपदवारे मुलाखती घेणेकामी संदर्भ क्र. 4 च्या आदेशान्वये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचे अध्यक्षतेखाली एकूण 5 सदस्यांची निवड समिती गठित करणेत आलेली होती.

उपरोक्त निकष विचारात घेऊन गठीत निवड समिती मार्फत दिनांक 02 डिसेंबर, 2022 रोजी मुलाखतीस पात्र उमेदवारांच्या ऑनलाईन झुम ॲपदवारे मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांची निवड करण्यांत आलेली आहे.

संदर्भ क्र. 2 मधील जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या विविध न्यायालयाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, विधी विषयक वाढीव पदविका, वकिली व्यवसायाचा अनुभव, शासकिय यंत्रणेच्या पॅनलवरील पुर्वानुभव, भाषा कौशल्य, विषयाची मांडणी, जिल्हा परिषदेशी निगडीत कायद्याबाबतचे ज्ञान व एकंदरीत व्यक्तिमत्व व प्रभाव इ. बाबींचा विचार करुन गठीत निवड समिती मार्फत दिनांक 02 डिसेंबर, 2022 रोजी मुलाखतीस पात्र उमेदवारांच्या ऑनलाईन झुम ॲपदवारे मुलाखती घेण्यांत आलेल्या आहेत. संदर्भ क्र. 5 अन्वये प्राप्त झालेल्या गठीत निवड समिती कडील पात्र उमेदवारांच्या गुणांच्या वर्गवारीचा अहवाल विचारात घेऊन खालील तक्त्यात नमूद केलेल्या विधी तज्ञांची त्यांचे नावसमोर नमूद केलेल्या न्यायालयामधील न्यायालयीन कामकाजाकरीता विधी सल्लागार पदी नियुक्ती करणेत येत आहे.

अ.क्र.	न्यायालय	नियुक्त केलेल्या विधी तज्ञांचे नांव	भ्रमणध्वनी क्र.
1	**सर्वोच्च न्यायालय, दिल्ली**	जगतनारायण राजकारण सिंग	9958904715 9422701037
2		सुहासकुमार साहेबराव कदम	9899742959
3		कैलास बाजीराव औताडे	9822594767
4		प्रशांत रामदास डहाट	9540638878
5		यतीन मोहनराव जगताप	7836038079
6		प्रशांत शांताराम चौधरी	7219302457

Scanned with CamScanner

7	उच्च न्यायालय, मुंबई	अशोक नुसारमजी कोटांगले	9322121966
8		दिलीप भैरू बोडके	9820191250
9		पूनम राजिंदर मितल	9029800802
10		धैर्यशील विजय सुतार	9920490380
11		निखिलेश दिलीप पोटे	8806300088
12		अश्विनीकुमार रामचंद्र कापडनीस	9833986624
13		प्रमोद गोकुळ कठाने	9821237367
14		पंकज पोपटराव देवकर	9960315456
15		रवींद्र सोनबा पाचुंदकर	8888859009

16	उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ	संदीप भैय्यासाहेब राजेभोसले	9850818645
17		वैशाली श्रीकृष्ण चौधरी	9922224207

18	महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण (मॅट), मुंबई	विजय गोरखनाथ मैड	9890673753 7755914474

19	मानवी हक्क आयोग, मुंबई	विजय गोरखनाथ मैड	9890673753
20		पंकज पोपटराव देवकर	9773567851
21		सिद्धेश्वर बाबा काळेल	9821660778

22	जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर (पुणे)	ज्ञानदेव तुळशीराम चौधरी	9422003816
23		दिपक पांडुरंग सरफळे	9860388876
24		विजय वैजिनाथ राऊत	9422323200
25		सुरेखा जगदीश डाबी	9423565074
26		किरण धनसिंग पाटील	8459473309
27		आश्विनी संदीप होगेपाटील	9370019475
28		माधवी गिरीश वैद्य आठवले	9881415544
29		के अँड डी लीगल	9860676714 8888605533
30		विजय योगेश पाटील	8669212344

31	कामगार / औद्योगिक न्यायालय, स्वारगेट, पुणे	दिपक पांडुरंग सरफळे	9860388876
32		सुवर्णा रवींद्र शिंदे	9975708938
33		महेश भिमराव गोसावी	9860102040

34	बारामती / इंदापूर / दौड	सिध्दार्थ भगवान मोरे	9850818185
35		धीरज माणिक लालबीगे	9860161617
36		योगेश विनायक चव्हाण	9420091000
37		अभयसिंह बाळकृष्ण कदम	9226786794

38	राजगुरुनगर (खेड) / आंबेगांव / जुन्नर	रमेश धोंडीभाऊ गोकुळे	9860744173
39		संजय दत्तात्रय आर्विकर	9423020793
40		महेश भिमराव गोसावी	9860102040
41		दिपाली गुणवंतराव देशमुख	9765591467
42		रेखा निशांत करंडे	9822667696

Scanned with CamScanner

43	दिवाणी न्यायालय, कनिष्ठ / वरिष्ठ स्तर, वडगांव मावळ	संतराम अनंत टरले	7499877863
44		राहुल त्रिंबकराव देशमुख	9423386838
45		गिरीराज रमेश गोफणे	9922645222

46	दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, भोर / सासवड	भाग्यश्री उदय गांगल	9881202241
47		अर्चना रामकृष्ण वाघे	9823539356

48	दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, शिरुर	भाग्यश्री उदय गांगल	9881202241
49		सुवर्णा रवींद्र शिंदे	9975708938
50		मिनल संदीप कुरुंदवाडे	9850887076

-: <u>ॲडव्होकेट पॅनल वर नियुक्त वकिलांकरीता अटी - शर्ती तसेच कर्तव्ये व जबाबदाऱ्या</u> :-

1. पुणे जिल्हा परिषदेकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदे विषयक बाबींबाबत तसेच न्यायालयीन प्रकरणांमध्ये कायदेशीर सल्ला देणे व जिल्हा परिषदेच्या हिताच्या दृष्टीने न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
2. जिल्हा परिषद हिताचे संवर्धन होईल याद्दष्टीने प्रशासकिय बाबींची माहिती घेऊन तसेच आवश्यक तो कायद्याचा आधार घेऊन जिल्हा परिषदेची बाजू पूर्ण क्षेमतेने व प्रभावीपणे न्यायालयात मांडणे.
3. सेवाविषयक / प्रशासकीय बाबी / विभागीय चौकशी / महसूल विषयक प्रकरणे तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती बाबत सर्व प्रकरणांमध्ये कायदेशीर सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
4. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्याच्या दृष्टीने सरकारी वकिलांकडे पाठपुरावा (जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी) व संबंधित अधिकाऱ्यांचे सहकार्य घेऊन आवश्यक ते प्रतिज्ञापत्र / शपथपत्र तयार करणे.
5. जिल्हा परिषदेच्या हिताच्या दृष्टीकोनातून न्यायालयीन प्रकरणांबाबत व कायदेशीर मार्गदर्शनाबाबत आवश्यक ती गोपनियता बाळगणे.
6. जिल्हा परिषद पॅनल वर नियुक्त करण्यात आलेल्या वकिलांना जेथे जिल्हा परिषद वादी / प्रतिवादी असेल अशा न्यायालयीन प्रकरणांमध्ये जिल्हा परिषदेच्या विरोधात वकिलपत्र स्विकारता येणार नाही. अशा स्वरुपाची बाब निदर्शनांस आल्यांस जिल्हा परिषद पॅनल वरील नेमणूक संपुष्टात आणणेची कार्यवाही केली जाईल.
7. ज्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाच्या विरोधी निकाल झालेले असतील अशा प्रकरणांमध्ये न्यायालयीन निर्णयाचा अभ्यास करुन गुणवत्तेनुसार वरिष्ठ न्यायालयाकडे अपिल दाखल करणे संदर्भात कायदेशीर मार्गदर्शन करणे.
8. पॅनलवरील एखादा वकिल त्यांचेकडे सोपविलेल्या न्यायालयीन प्रकरणाच्या बाबतीत जिल्हा परिषदेची बाजू पुरेशा प्रभावाने मे. न्यायालयामध्ये मांडत नसल्याची बाब निदर्शनास आल्यांस त्यांचे सदर प्रकरणातील वकीलपत्र रदद करण्यात येऊन त्यांची पॅनल वरील नेमणूक संपुष्टात आणण्यात येईल.

Scanned with CamScanner

9. पॅनल नियुक्त करण्यात आलेल्या वकिलांना न्यायालयीन दाव्याच्या संदर्भातील विषय, सदर विषयाच्या कामकाजातील नैपुण्यता इ. बाबींचा विचार करुन दावे सुपूर्द केले जातील.

10. जिल्हा परिषद स्तरावर बोलविण्यात येणाऱ्या न्यायालयीन दाव्यांच्या आढावा संदर्भातील सभांना उपस्थित राहून त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या दाव्यांच्या सद्य:स्थितीचा अहवाल सादर करणे अनिवार्य राहिलं.

11. न्यायालयीन प्रकरणा संदर्भात वेळोवेळी झालेल्या सुनावणीचा अहवाल संक्षिप्त स्वरुपात सात दिवसाच्या आंत प्रत्येक सुनावणीनंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील.

-: <u>वकील फी चे दर व त्याबाबतचे निकष</u> :-

<u>ॲडव्होकेट पॅनल वरील निवड केलेल्या वकिलांना खालीलप्रमाणे वकिल फी अनुज्ञेय राहील</u>.

अ. क्र.	न्यायालय	वकील फी (प्रति दावा)	इतर खर्च (प्रति दावा)	एकूण फी (प्रति दावा)	शेरा
1	मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली	65000	15000	80000	दाव्याच्या अनुषंगाने वकीलपत्र व जि. प. चे म्हणणे परिच्छेदनिहाय अभिप्रायासह सादर केल्यानंतर 50% व अंतीम निकालानंतर निकालाची प्रमाणित सत्यप्रत सादर केल्यानंतर ऊर्वरित 50%
2	मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ	20000	5000	25000	
3	मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ	20000	5000	25000	
4	मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ	20000	5000	25000	
5	मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण	20000	5000	25000	
6	मा. जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर, पुणे (वरिष्ठ / कनिष्ठ स्तर)	15000	3000	18000	
7	मा. कामगार / औद्योगिक न्यायालय, स्वारगेट, पुणे	13000	2000	15000	
8	तालुका स्तरीय न्यायालय (आंबेगांव / बारामती / भोर / दौंड / इंदापूर / जुन्नर / खेड / मावळ / पुरंदर / शिरुर)	13000	2000	15000	
9	कायदेविषयक अभिप्राय देणे	3000	--	3000	कार्यवाही नंतर अदा करणे
10	कायदेशीर नोटीस देणे अथवा नोटीशीस उत्तर देणे	5000	500	5500	
11	जिल्हा न्यायालय / कामगार-औद्योगिक न्यायालय येथे कॅव्हिएट दाखल करणे	5000	--	5000	
12	मा. उच्च न्यायालय, मुंबई / औरंगाबाद / नागपूर खंडपीठ येथे कॅव्हिएट दाखल करणे	5000	2000	7000	
13	रिट याचिकेचे परिच्छेदनिहाय उत्तर तयार करुन देणे	5000	--	5000	

Scanned with CamScanner

<u>वकिल फि अदा करणेच्या संदर्भातील अनुषंगिक बाबी पुढील प्रमाणे राहतील</u> :-

1. वकिल फी व खर्चाच्या रक्कमा वरील तक्त्यात संबंधित बाबीसमोर नमूद केल्याप्रमाणे अदा करण्यांत येतील. वकीलपत्र दाखल करुन जिल्हा परिषदेच्या वतीने लेखी म्हणणे / शपथपत्र / प्रतिज्ञापत्र / परिच्छेदनिहाय अभिप्राय दाखल केल्यानंतर प्रथम 50% व अंतीम निकाल झालेनंतर निकालाची प्रमाणित सत्यप्रत (सर्टिफाईड कॉपी) सादर केल्यानंतर ऊर्वरित 50% फी अदा करण्यांत येईल.
2. दावा दाखल झालेल्या सुरुवातीच्या काळात पक्षकाराने दावा काढून घेतल्यास जिल्हा परिषदेच्या वकीलांना 50 टक्केच फी देय राहील. परंतू वादीने दाव्याच्या शेवटच्या स्टेज पर्यंत दावा काढून घेतल्यांस जिल्हा परिषदेच्या वकिलांना पूर्ण 100% फी अदा करण्यांत येईल. दावा निकाली झाल्यानंतर दाव्याची प्रमाणित सत्यप्रत देण्याची जबाबदारी पॅनल वरील वकिलांची राहीलं.
3. उपरोक्त नमूद अनुज्ञेय खर्चामध्ये न्यायालयात सादर करावयाचे लेखी म्हणणे, जादा म्हणणे, दावा दुरुस्ती व वकिलांनी कोर्टात सादर करावयाचे अर्जाचे टायपिंग, निकालाची प्रमाणित सत्यप्रत उपलब्ध करुन देणे इ. खर्चाचा समावेश आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने रिट याचिका, दावा किंवा अपील दाखल करताना कोर्ट फी भरावी लागत असल्यांस ती अतिरिक्त देय राहीलं.
4. सुपूर्द केलेल्या प्रकरणांनुसार काही वेळा वकिलांना कार्यक्षेत्रा बाहेरील कोर्टात उपस्थित राहून कामकाज करावे लागते अशा प्रकरणी प्रवास भत्ता, दैनिक भत्ता वकिल फी व्यतिरिक्त देय राहीलं. सदर भत्ता जिल्हा परिषदेच्या वर्ग-2 अधिकाऱ्यांना देय असलेल्या दराने अदा करण्यात येईल. मात्र अशा प्रकरणी त्यांना नियुक्त केलेल्या कार्यक्षेत्राबाहेर न्यायालयीन कामकाजासाठी उपस्थित राहणेबाबत संबंधित खातेप्रमुखांची लेखी पूर्व संमती घेणे आवश्यक राहीलं.
5. जिल्हा परिषदेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे व संवेदनशील न्यायालयीन दाव्यांमध्ये तसेच वर नमूद फी मध्ये प्रकरणपरत्वे वाढ करण्याचे अधिकार मा. स्थायी समितीस राहतील. पॅनल मधील विशिष्ट वकील अथवा पॅनल व्यतिरिक्त विधीज्ञांची (वकिलांची) नियुक्ती करण्याचा व त्यांची फी ठरविण्याचा अधिकार मा. स्थायी समितीला राहील.
6. कोणत्या वकिलास कोणते व किती दावे द्यायचे याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना असून या संदर्भात सर्व वकिलांना समसमान पध्दतीने अथवा विशिष्ठ विभागाचे दावे विशिष्ठ वकिलांकडे देणे अथवा विशिष्ठ स्वरुपाचे दावे विशिष्ठ वकिलांकडे देणे यापैकी यथोचित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

सही /- x x x
आयुष प्रसाद (भा.प्र.से.)
प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रति.

श्री. / श्रीमती. _____
पत्ता :- _____
जिल्हा परिषद कायदे सल्लागार (सर्व)

Scanned with CamScanner

प्रत :- **माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

(1) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे.

(2) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे.

(3) खातेप्रमुख (सर्व), पुणे जिल्हा परिषद, पुणे.

(4) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), जि. पुणे.

2/- सदर आदेशाच्या दिनांकापासून नव्याने प्राप्त होणारे न्यायालयीन प्रकरणे सदर आदेशानुसार नियुक्त करण्यांत आलेल्या संबंधित विधी तज्ञांकडे सुपूर्त करणेची कार्यवाही करणेत यावी. तसेच नव्याने नियुक्त केलेल्या विधी तज्ञांना सोपविण्यांत येणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांची स्वतंत्र नोंदवही तसेच अभिलेखे ठेवून जतन करण्यांत यावेत. अपवादात्मक परिस्थितीमध्ये पॅनल बाहय वकिलांना वकिलपत्र देण्याची आवश्यकता असल्यांस मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची लेखी मान्यता घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

पुणे जिल्हा परिषद, पुणे * सामान्य प्रशासन विभाग *

आयुष प्रसाद (भा.प्र.से.)
प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद, पुणे

Scanned with CamScanner